INDIAN THINKER ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

# भारतातील समाज जीवनावर धर्म संस्थेचा पगडा

**डॉ. दादाराव पानपट्टे**
शरदचंद्र महाविद्यालय ,नायगांव

21

## Research Paper - History

युरोपच्या आणि पर्यायाने जगाच्या इतिहासातील ज्या नवविचारांच्या आंदोलनासाठी आपण ही संज्ञा वापरतो. तथापि पुररूज्जीवन हा शब्द केवळ त्या आंदोलनाचे प्रारंभिक तात्कालीक कारण दाखवितो, तर या शब्दयोजनेमुळे त्यांचे सम्यक स्वरूप स्पष्ट होते. त्यामुळे शब्द अधिक अन्वर्धक म्हणून स्वीकारणे योग्य होईल.

साधारणतः पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून सुरू झालेल्या नवविचारांच्या आंदोलनाला म्हटले जाते. प्राचीन वैभवशाली रोमन साम्राज्य इसवी सनाच्या पाचव्या शतकामध्ये नष्ट झाले होते. परंतु त्या रोम संस्कृतीत उदभवलेले एक बायझेंटाइन नावाचे साम्राज्य पूर्व युरोपमध्ये टिकून राहिले होते. इ.स. १४५३ मध्ये तुर्की मुसलमानांच्या रानटी हल्यामुळे या साम्राज्याची राजधानी कॉन्स्टॅन्टिनोपाल हे शहर पडले व ते साम्राज्यही कोसळले. या साम्राज्याची बाकी स्थिती कशही असली तरी, ते विदानांना आश्रय आणि अभय असे. चौदाव्या शतकापासून तुर्कीचे हल्ले होऊ लागल्यापासून कॉन्स्टॅटीनोपलमधील काही विध्दान अधिक सुरक्षिततेसाठी युरोपमध्ये येतच होते. परंतु इ.स. १४५३ नंतर मात्र येथे राहणे अशक्य झाले होते आपापले जुने ग्रीक भाषेतील ग्रंथसंग्रह घेवून ते विध्दान युरोपच्या पश्चिम व दक्षिण भागात आले. प्रारंभी तरी मुख्यतः इटलीमध्ये तेथील धनिकाच्या आश्रयाखाली त्यांचा विद्याव्यासंग सुरू झाला. जुन्या ग्रीक व लॅटीनमधील ज्ञानाला या विध्दानांनी पुन्हा उजाळा आणला. ग्रीक - रोमनांच्या शास्त्रीय दृष्टिकोणांचा आणि स्वतंत्र विचारांचा एक नवाच अर्थ उलगडू लागला या विचारक्रांतीला पुररूज्जीवन म्हटले गेले, जुन्या ग्रीक व रोमन ज्ञानाला पुन्हा नव्याने महत्त्व प्राप्त झाले ते

ISSN 2320 - 6128
Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

त्यामुळेच होय. परंतू जुन्या ग्रंथाची फक्त पारायणे केली जात नव्हती त्यातून अनेक नव्या विचारांना व उपक्रमांना चालना मिळून नवजिवनाची, नव्या वैचारिक व जागृतीची तुतारी फुंकली गेली. म्हणून या क्रांतीला प्रबोधन असे म्हटले जाते.

प्राचीन काळी आघाडीवर असलेल्या भारताचे समृध्द जीवन संकटात आले होते. उत्कृष्ट तत्वज्ञानाची जागा तत्वशून्य कर्मकाण्ड अतर्कनिष्ठ क्रियाकर्म, क्रूर पाशवी प्रथा, रूढी, परंपरा यांनी घेतली होती. आत्मविश्वास गमावून येथील जनता अविवेकाच्या ओझ्याखाली दबली गेली होती. भारतीय जनता परिस्थितीची गुलाम झाली होती. सामाजिक आचारात आणि राजकारणात व धर्मक्षेत्रात व कालाक्षेत्रात भारतीय जनता गुलाम झाली होती. केवळ भारतीय संस्कृतीचे, वैभवाचे चैत्यनहिन सांगाडे तेवढे शिललक राहिले होते.

मध्ययुगात म्हणजे साधारणतः इ.स. ५००-१५०० या दरम्यान युरोपमध्ये सुसंघटीत व स्थिर राज्ये नव्हती त्यामुळे सामाजिक स्वास्थ नव्हते. जनमतावर व राज्यसंस्थेवरही ख्रिस्ती धर्मस्थेचा पगडा होता. तरीही मध्ययुगात युरोपमध्ये काही विद्यापीठे स्थापन झाली होती. व्यापारी शहरातून विध्दानांना थोडाबहून आश्रय मिळालेला होता. युरोप व आशिया खंडाच्या सीमारेषांवर ख्रिस्ती आणि मुसलमान यांच्यात जी धर्मयुध्दे झाली, त्यामुळे कळत नकळत युरोपीयानांची ज्ञानलालसा वाढीस लागली होती. तेंव्हा इ.स. १४५३ पुर्वी युरोपमध्ये कुठे काही ज्ञानाचा, विचारांचा, साहित्यांचा किंवा कलेचा कॉन्स्टॅन्टिनोपोलचा पाडाव हेच एकमेव कारण घडले असे नाही. तथापि हेही खरे की, त्या वैचारिक आंदोलनाला खूप वेग आला आणि नवे वळण, मिळाले, ते पंधराव्या शतकाच्या मध्यापासून व तो वेग पुढे चालूच आहे.

प्राचिन व मध्ययुगात धार्मिक साहित्य प्रचंड प्रमाणात निर्माण झाले. तत्वज्ञान आणि शास्त्राचा समावेश हया धार्मिक साहित्यातच केलेला होता. लौकीकसाहित्याला वाङमयनिर्मितीत स्थान नव्हते. प्रबोधनकाळातल्या साहित्याने ही स्थिती पार बदलून टाकली. साहित्याचे नवनवीन प्रकार व नवनवीन विषयांवर साहित्य निर्माण झाले. पुर्वीचे साहित्य धर्म, देवता, चर्च, धर्मगुरू व धार्मिक तत्वज्ञान हयाच विषयांत गुतून पडलेले होते परंतु प्रबोधनकाळातल्या लेखकांनी मानव्यवादी साहित्य जन्माला घातले.

युरोपमध्ये मध्ययुगापूर्वी प्राचीन ग्रीक आणि रोमनांनी आणि युरोपबाहेर प्राचीन इजिप्शियन, सुमेरियन व भारतीय वगैरेंनी सखोलपणे रसायन, वैद्यकशास्त्र खगोलशास्त्र वगैरे शास्त्रांचा

INDIAN THINKER
ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal   Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

अभ्यास केला होता परंतु मध्ययुगात हे ज्ञान अंशतः विसरले गेले होते, तर अंशतः धर्मगुरूनी ते दडपलेही होते. तथापि, मध्ययुगातही तेराव्या शतकात रॉजर बेकनसारखे शास्त्रज्ञ होऊन गेले होते कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष निरीक्षणाने आणि प्रयोगाने सिध्द झाल्याखेरीज स्वीकारू नये, असे ठाम सांगणारा रॉजर बेकन नवविज्ञानाचा आणि म्हणून नवयुगाचा जनकच मानला पाहिजे.

पोलंखडमधील निकोलस कोपर्निकसने इ.स. १४७३-१५४३ आपल्या नव्या खगोलशास्त्रीय सिध्दान्ताने सारे युरोप हलविले. सुर्य स्थिर आहे आणि पृथ्वी व इतर ग्रह त्याच्या भोवती फिरत असतात हे त्यानेच प्रथम प्रमाण देवून प्रतिपादन केले. इटलीतील गॅलिलिओ इ.स. १५६४ इ.स. १६३० जर्मनीतील केपलर इ.स. १५७१, इ.स. १६३० इत्यादी शास्त्रज्ञांनी कोपर्निकसचा पाठपुरावा केला. याबद्दल त्यांनी चर्चकडून फटक्यापासून ते जीवंत जाळून घेण्यापर्यंतच्या सर्व शिक्षा भोगल्या. या सर्व संशोधनाच्या प्रयोगांच्या आधारावरच न्यूटन इ.स. १६४२-१७२७ याने आपला गुरूत्वाकर्षणांचा सिध्दांत सांगून आधुनिक विज्ञानाचा पाया घातला. अशा मुलभूत संशोधनाबरोबर या काळात वैद्यकशास्त्रासारख्या उपयुक्त विज्ञानाचाही अभ्यास वाढीला लागला. घड्याळ, दुर्बिण वगैरे नवी प्रायोगिक उपकरणे तयार होऊ लागली आणि आपल्या सिध्दांताची सत्यता काही अशी प्रत्यक्षपणे दाखविता येऊ लागली.

विविध शास्त्रांची निर्मिती होवून तत्वज्ञानात फार मोठे परिवर्तन झाले. स्वर्ग, नरक, मोक्ष, देवता, धर्मा एवेजी मानवी जीवन, मानवाचे अंतरंग, भावभावना, विचार व मानवी संबंधाचे विवेचन करणारे तत्वज्ञान निर्माण झाले. शास्त्रातही वैविध्यता निर्माण झाली. धर्मसुधारणा, प्रबोधन व वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवी विचार मुकत होऊ लागला व त्यातून नविन तत्वज्ञान व शास्त्राची निर्मिती झाली. मानवतावाद (Humanitarisnism) हा सर्व ज्ञानशास्त्राचा पाया होता.

तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रातील प्रबोधन कालातील अत्यंत महत्त्वाचा शोध म्ळणजे छापखान्याचा. जर्मनीतील गटेबर्ग (इ.स. १४००-१४६८) हा या मुद्रणकलेचा जनक. या क्षेत्रात प्राथमिक स्वरूपाचे प्रयोग पुर्वी झाले होते. परंतु सर्व दृष्टीनी सोयिस्कर आणि सुसज्य असा पहिला छापखाना गुटेनबर्गने उभा केला. मुद्रणकलेच्या वाढीला इंग्लडमधील कॅक्स्टन याचा उद्योगही बराच उपयोगी ठरला. येथून पुढे युरोपभर अनेक ठिकाणी छापखाने निघाले. घरोघरी सर्वसामान्यापर्यंत सुलभपणे ज्ञान पोचवायचे असेल तर आवश्यक त्या लिखिताच्या हजारो,

INDIAN THINKER ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

लाखो प्रती निघाल्या पाहिजेत आणि त्याही अल्पावधीत आणि अल्पखर्चात हे केवळ मुद्रणकलेच्या शोधानेच शक्य झाले. नवयुगीन कल्पनांचा जो फार मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला आणि नवक्रांतीच्या निर्मितीला जो वेग आला, तो छापखान्याखेरीज येऊच शकत नव्हता.

वैचारिक आणि ललित साहित्यही पूर्वीच्या साहित्यापेक्षा स्पष्टपणे वेगळे दिसू लागले. पहिली अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की, त्या काळचे बरेच साहित्य इटली, फ्रान्स, इंग्लड वगैरे देशातून त्या त्या राष्ट्रातील लोकांना समजणाऱ्या त्यांच्या त्यांच्या भाषातून निर्माण झाले. रोमन साम्राज्याच्या काळात आणि मध्ययुगात संपूर्ण युरोपची ज्ञानाची, देवाणघेवाणीची भाषा लॅटीन ही होती. लॅटीन मुख्यतः ख्रिस्ती धर्मस्थंची भाषा, लॅटीनमध्ये निर्माण होणारे साहित्यही पुष्कळसे धर्मशास्त्राशी संबंधीत असे. काही प्रमाणात ग्रीक भाषासुध्दा विध्दानांमध्यल्या व्यवहारांचे माध्यम होई. परंतु सर्वसामान्यांना या दोन्ही भाषा अवगत नसत. तेंव्हा ग्रीक आणि लॅटीन या भाषांतील ज्ञानाचे पुनरूज्जीवन होत असले तरी, ते ज्ञान समाजापर्यंत समाजाच्या भाषातून पोचविण्याची गरज होती. अर्थात या कार्याचा प्रारंभही मध्ययुगातच झाला होता. डान्टे या सुप्रसिध्द कवीने लॅटीनला रामराम ठोकून इटलियनमधून आपल्या काव्यरचना केल्या होत्या. पेट्रार्क (इ.स. १३०४-१३७४) हा इटालिययानमधून लिहिणारा दुसरा कवी बोकॅशिओने (इ.स. १३१३-१३७५) त्याच भाषेत आकर्षक गद्य लिहिले होते. आपल्या गोष्टीतून त्याने धर्मसंस्थेतील अनैतिक आणि उच्छखल वर्तनाचे चित्रण करून आणि तेथील गैरव्यवहार चव्हाट्यावर आणून, अगदी आजपर्यंत टिकून राहिल अशी अफाट लोकप्रियता मिळवली.

(तेराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ वगैरे संतकवींनी निर्धाराने संस्कृतचा त्याग करून आव्हानपूर्वक मराठीसारख्या लोकभाषेतून ग्रंथरचना केली. हा कालयोग लक्षणीय वाटतो खरा, परंतू दुर्देवाने या संतांच्या लेखनातून युरोपातल्याप्रमाणे नवयुगाचे दर्शन होत नाही) ॲरिओस्टो (इ.स. १४७४-१५२१) हा पुनरूज्जीवन कालातील इटालियन कवी लोकभाषेतून साहित्यनिर्मिती करण्याचीच परंपरा पुढे चालवीत होता. परंतू तो थोडा पुढे गेला आणि त्याने आता आपण देवादिकांच्या आणि साधूसंतांच्या भाकडकथा न सांगता माणसांची सुख-दुःखेच सांगणार असे जाहीर करून एक प्रकारे प्रबोधनकालाचे ध्येयच सांगून टाकले. इटालियनच्या बरोबरीने किंवा पाठोपाच फ्रेंच, इंग्रजी वगैरे भाषातून साहित्य निर्माण होऊ लागले. सर्व्हातेच्या (इ.स. १५४७-१६१६) स्पॅनिशमधील डॉन क्विझोट या ललित कृतीत

INDIAN THINKER ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

त्याच्या भोवतालच्या समाजाच्या भपकेबाजपणाचे तर दर्शन होतेच, शिवाय वास्तववादी, मनोरंजक साहित्याचाही तो शुभारंभ होता. इंग्रजीतून अक्षर नाटयकृती निर्माण करणारा शेक्सपिअर (इ.स. १५६४-१६१६) हा ही या खराखुरा प्रतिनिधी आहे. या काळात फक्त ललित कृतीच निर्माझ झाल्या असे नाही. मॉटेन (इ.स. १५३३-१५८२) याने निबंध लेखन केले. त्याच्या लेखनात ठायीठायी माणसातील आत्मविश्वासाचे आणि जिद्दीचे दर्शन घडते. टॉमर मूरच्या (इ.स. १४७८-१५३५) युटोपिया (काल्पनिक आदर्श राज्य) या ग्रंथात त्याच्या काळच्या समाजरचनेविषयीची आणि राज्यपध्दतीविषयीची त्याची असंतुष्टता स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. इंग्लडमधील फ्रान्सिस बेकनने (इ.स. १५६०-१६२६) तत्कालीन सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर स्फुट निबंध लिहिले. इटलीतील मॅकियाव्हेलीने (इ.स. १४६९-१५२७) प्रिन्स हा राज्यशास्त्राचे तंत्रमंत्र सांगणारा ग्रंथ धर्मसुत्राचा आधार न घेता लिहिला.

इटलीमध्ये पोपचे वर्चस्व आपआपसातल्या फाटाफुटीमुळे क्षीण झाले होते. लहानलहान चाळीस - पन्नास राज्य व घटक राज्य यामध्ये इटलीचे तुकडे झाले होते.

## संदर्भ सूची

१) गर्गे स.मा. (संपादक)- भारतीय समाज विज्ञान कोष, खंड-३रा, प्रकाशन, स.मा.गर्गे (संचालक), समाज विज्ञान मंडळ, ज्ञानेश, शिवाजी नगर, पुणे.

२) डॉ. भोळे भा.ल. - आधुनिक भारतातील राजकिय विचार, पिंपळपुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३) डॉ. जोशी पी.जी. - आधुनिक जग, विद्या प्रकाशन, नागपूर.